RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

■ बीड ■ साप्ताहिक ■ मराठी ■ वर्ष २२ वे ■ अंक ११ ■ सोमवार दि.१७ मार्च २०२५ Mo.9422748792/ 9822628521 पाने : ४ किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -11 | MONDAY DT.17 MARCH 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES


## सुरेश धसांनी ‘खोक्या’च्या वस्तीवर दिली भेट:कुटुंबियांचे केले सांत्वन



बीड - भाजप आमदार सुरेश धस हे आज शिरूरच्या दौऱ्यावरती असून त्यांनी सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या कुटुंबीयांची भेट घेतली. तीन दिवसांपूर्वी सतीश उर्फ खोक्या भोसले याचे घर आणि ऑफिस ग्लास हाऊस वन विभागाकडून पाडण्यात आले होते. सदरील घर आणि ऑफीस वन विभागाच्या जागेवर असल्याचे कारण सांगत वन खात्याने ही कारवाई केली होती. त्यानंतर आज

(उर्वरीत पान २ वर)

# वन्य प्राण्यांच्या शिकारींची बोंबाबोंब होताच वन्य प्राण्यांच्या मांसाहारासाठीचे प्रसिद्ध धाबे रातोरात बनले शुद्ध शाकाहारी !



### खोक्याला अटक होताच वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्या टोळ्या झाल्या भूमिगत

बीड /प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील बावी येथील वन्य प्राण्यांच्या शिकारीच्या घटनेनंतर वन्य प्राण्यांची शिकारीची बोंबाबोंब होताच कारवाईच्या धास्तीने वन्य प्राण्यांच्या चटकदार व स्वादिष्ट मांसाहारासाठीचा दावा करणारे आष्टी ,पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील प्रसिद्ध धाबे रातोरात चटकदार, स्वादिष्ट व शुद्ध शाकाहारी बनल्याने वन्यप्राण्यांच्या मांसाहाराला चटावलेल्या खवय्यांचा या वर्षी रंगीत धुळवडीचा एकीकडे बेरंग झाला. तर दुसरीकडे वन्य प्राण्यांच्या शिकाऱ्यांचा म्होरक्या सतीश भोसले गजाआड झाल्याने या तिन्ही तालुक्यातील वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्या टोळ्या गेल्या दोन आठवड्यापासून भूमिगत झाल्याची या तालुक्यात सर्वत्र चर्चांनी जोर धरला आहे.

शिरूर कासार तालुक्यातील बावी येथील ढाकणे या शेतकऱ्यांनी वन्य प्राण्यांच्या शिकारीला विरोध केल्यामुळे त्यांना बेदम मारहाण करून अपंग करणाऱ्या सतीश भोसले या शिकाऱ्याविरुद्ध जन आक्रोश निर्माण होऊन राज्यभर हरिण , काळवीट, ससे ,मोर या वन्य प्राण्यांची हत्याची बोंबाबोंब झाल्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्या सतीश भोसले विरुद्ध गुन्हा दाखल झाल्याबरोबर आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यात वन्य प्राण्यांची दररोज राजरोस शिकार करणाऱ्या अन्य टोळ्या भूमिगत झाल्याने या तिन्ही तालुक्यात वन्य प्राण्यांच्या चटकदार व स्वादिष्ट मांसाहाराचा दावा करणारे प्रसिद्ध असलेले धाबे या घटनेनंतर कारवाईच्या भीतीपोटी रातोरात चटकदार, स्वादिष्ट व शुद्ध शाकाहारी बनल्याने वन्य प्राण्यांच्या मांसारासाठी चटावलेले खवय्यांच्या धुरवडीचा यावेळी मात्र बेरंग झाला असल्याची चर्चा संपूर्ण तालुक्यात होत आहे.

वन्य प्राण्यांच्या मांसासाठी अप्रत्यक्षरित्या वन्य प्राण्यांच्या शिकारींना पाठबळ देणाऱ्या ढाबाचालकांची आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यात मोठी लॉबी कार्यरत असल्याची जनतेत चर्चा असून या लॉबीच्याआणि काही राजकीयांच्या राजश्रयाने वन्य प्राण्यांच्या शिकारी राजरोसपणे

(उर्वरीत पान २ वर)

## बीडमधील शिक्षक नागरगोजे यांच्या मृत्यूनंतर सुप्रिया सुळे सरसावल्या

### ‘गुरुजी’प्रश्नी शासनाला दाखवला आरसा



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एका आश्रम शाळेवर तब्बल १८ वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केल्यानंतरही ना पगारीचा पत्ता, ना कायम होण्याची शाश्वती, त्यातच संस्थाचालकांकडून होणारा त्रास असह्य झाल्याने एका तरुण शिक्षकाने आपले जीवन संपवले. आपल्या फेसबुक अकाऊंटवरुन भावनिक पोस्ट लिहत धनंजय नागरगोजे यांनी मृत्यूला जवळ केले. या घटनेनं शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून ही घटना मन सुन्न करणारी आहे. धनंजय नागरगोजे हे बीडच्या केळगाव येथील आश्रम शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. गेल्या १८ वर्षापासून ते या शाळेत काम करत होते, मात्र अठरा वर्षापासून त्याना पगार न मिळाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती खालावली. त्यातूनच, त्यांनी गळफास घेत आपले जीवन संपवले. या घटनेनंतर विनाअनुदानित शिक्षकांचा प्रश्न नव्याने चर्चेत आला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनीही बीडच्या घटनेचा उल्लेख करत सरकारपुढे प्रश्न मांडले आहेत. तसेच, शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

शिक्षक हा समाज व्यवस्थेचा कणा मानला जातो, समाज आणि भावी पिढी घडविण्याची मोठी जबाबदारी शिक्षक वर्गावर आहे. मात्र, विनाअनुदानित शाळांमुळे शिक्षकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न नेहमीच चर्चिला जातो. एकीकडे शिक्षकांच्या पगारीवरुन अनेकदा टोमणे मारले जातात, शिक्षकांना मिळणारा पगार जास्त असल्याची चर्चाही होते. मात्र, विना अनुदानित संस्थांमधील शिक्षकांचा प्रश्न गंभीर आहे. ज्या संस्थेवर हा शिक्षक काम करत असतो त्या संस्थाचालकाकडून पगार नसतानाही वेठ बिगारी मजुराप्रमाणे त्यांच्याकडून कामे करून घेतली जातात. वर्षानुवर्षे त्याला त्याच्या कामाचा मोबदला दिला जात नाही, मग त्याने घर चालवायचे कसे? या प्रश्नाचं उत्तर ना संस्थाचालक देतो ना शासन. याच विवंचनेतून बीडमधील एका विना अनुदानित शिक्षकाने फेसबुक पोस्ट करत आपले जीवन संपवल्याच्या घटनेनं महाराष्ट्र हळहळला आहे. तसेच, विना अनुदानित शिक्षकांचा प्रश्नही यानिमित्ताने समोर आला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत ट्विटरवर पोस्ट लिहित सरकारला आरसा दाखवला आहे.

बीड जिल्ह्यातील धनंजय नागरगोजे या शिक्षकाची आत्महत्या अतिशय दुःखद आणि दुर्दैवी घटना आहे. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात तळागाळातील जनतेपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी आयुष्य वेचले. त्याच महाराष्ट्रात शिक्षकाला आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागतो हे राज्याला भूषणावह नाही, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. तसेच, शिक्षकांना आदराने 'गुरुजी' म्हटले जाते. हे गुरुजी भावी पिढ्या घडविण्यासाठी

(उर्वरीत पान २ वर)

## तीच माझी भूमिका

### औरंग्याची निशाणी महाराष्ट्रात कशाला ?



मुंबई: शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देहू येथे श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार देण्यात आला. आजचा दिवस माझ्यासाठी अतिशय आनंदाचा आहे. कारण, जगद्गुरु संत तुकाराम महाराज पुरस्कार माझ्यासारख्या साध्या कार्यकर्त्याला देहू येथील वारकऱ्यांनी दिला. हा माझ्या एकट्याचा पुरस्कार असून तो वारकरी, धारकरी, शेतकऱ्यांचा आणि लाडके भाऊ-बहिणींचा असल्याचे एकनाथ शिंदेंनी म्हटले. मुख्यमंत्री असताना तीर्थक्षेत्राबाबत जे निर्णय घेतले, त्यामुळे हा पुरस्कार मला दिला. वारकरी समाज प्रबोधन करतात, त्यांच्याकडून मिळालेला हा पुरस्कार सर्वात मोठा आहे, असे एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना म्हटले. या पुरस्कार सोहळ्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर हटविण्यासंदर्भात सुरू असलेल्या मागणीवरही आपली भूमिका मांडली. औरंग्याची निशाणी महाराष्ट्रात कशाला पाहिजे ही भावना शिवभक्तांची आहे, तीच माझी भावना आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रात औरंगजेबाची कबर हटविण्यावरुन सुरू असलेल्या वादावर पहिल्यांदाच शासनाच्यावतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका मांडली आहे. शिवभक्तांच्या भावनांचा आदर मी करतो, औरंगजेबान संभाजी महाराजांचा अनन्वित छळ केला. संभाजी महाराज यांचे शौर्य आणि औरंगजेबाचे क्रौर्य, त्या क्रौर्याची परिसीमा त्याने गाठली होती. अशा औरंग्याची निशाणी महाराष्ट्रात कशाला पाहिजे ही भावना शिवभक्तांची आहे, तीच माझी भावना आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. जो खरा देशभक्त आहे, त्याने औरंगजेबाचे उदात्तीकरण करू नये. क्रूरकर्मा औरंग्याचे कोणीही समर्थन करता कामा नये. तो महाराष्ट्राचा दुश्मन होता, देशद्रोही, राष्ट्रद्रोही होता, अशा या औरंग्याच्या खाणाखुणा महाराष्ट्रात कशाला पाहिजे. जे उदात्तीकरण करतात त्यांचा निषेध केला पाहिजे, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

# धनंजय देशमुखांनी घेतली जरांगेंची भेट

### न्यायालयीन प्रक्रियेबाबत केली चर्चा, म्हणाले – आरोपीला वाचवण्याची तयारी असेल तर विनाश जगजाहीर

बीड । प्रतिनिधी

तुम्ही आरोपीला वाचवण्याची तयारी करत असाल तर तुमचा विनाश हा जग जाहीर असेल, असा इशारा धनंजय देशमुख यांनी दिला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाली आहे. या सुनावणीवर प्रतिक्रिया देताना धनंजय देशमुख यांनी उपरोक्त इशारा दिला आहे. काही लोक या प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करत असल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. मात्र आम्ही या प्रकरणाला कधीही वेगळी दिशा मिळू देणार नसल्याचे त्यांनी म्हटले.



धनंजय देशमुख यांनी आज मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी जरांगेंच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या न्यायालयीन प्रक्रियेबाबत चर्चा केली. या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधला. येत्या २६ तारखेपासून खऱ्या अर्थाने न्यायालयीन प्रक्रियेला सुरुवात होईल, असे धनंजय देशमुख म्हणालेत.

काय म्हणाले धनंजय देशमुख?

काही लोक कुठेतरी या प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या विषयाला आम्ही कधीही वेगळी दिशा मिळू देणार नाही. आम्ही कोणत्याही गुन्हेगाराचे समर्थन करणार नाही. मात्र काही ठराविक लोक आरोपीचे समर्थन करत आहेत, हे प्रकरण मागे टाकण्यासाठी काहीतरी वेगळे करत आहेत. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याचे समर्थन करणारे कोण असतील, त्यांना असे वाटत आहे

(उर्वरीत पान २ वर)

## फडणवीस औरंगजेबाइतकेच क्रूर शासक

### त्यांना शिवरायांचा इतिहास पुसून टाकायचाय– हर्षवर्धन सपकाळ



बीड । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस हे औरंगजेबाइतकेच क्रूर शासक आहेत. त्यांना शिवरायांचा इतिहास पुसून टाकायचा आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेसला काहीशे अडचणीचे दिवस आले आहेत. हे नाकारता येणार नाही. मात्र ही परिस्थिती लवकरच बदलणार आहे. काँग्रेसच्या विचारधारेला मानणारी जनता या ठिकाणी आहे. त्यामुळे येणार्या काळात पक्ष संघटना पुन्हा वाढलेली दिसेल.

नेमके काय म्हणाले सपकाळ?

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, हर्षवर्धन

(उर्वरीत पान २ वर)

## गरिबांच्या फ्रीजला वाढती मागणी माठ शीतपेय कलिंगडाकडे ओढा

अहिल्यानगर(प्रशांत बाफना) मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून कडक उन्हाळा जाणवू लागला आहे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे वाढत्या तापमानामुळे नागरिक बाजारात विक्रीसाठी आलेल्या गरिबांचा फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठाची खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करण्यासाठी रसवंती ग्रह व थंडपेयाच्या गाड्यांवर गर्दी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे बाजारात लावलेल्या ठिकठिकाणी थंडपेयाच्या गाड्यांवर नागरिकांची पावले वळत आहेत

(उर्वरीत पान २ वर)

## औरंगजेबाच्या कबरीबाबत मोठा निर्णय, पोलीस प्रशासन हायअलर्टवर

बीड । प्रतिनिधी

सध्या देशात औरंगजेब आणि त्याच्या कबरीवरून वाद सुरू आहे. प्रकरण एवढं तापलं आहे की, काही जणांनी तर थेट औरंगजेबाची कबर पाडण्याचा इशारा दिला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर औरंगजेबाची कबर असलेल्या परिसरामध्ये पोलिसांकडून कडेकोट सुरक्षा बंदोबस्त लावण्यात आला आहे. ठिकठिकाणी बॅरिकेडिंग लावण्यात आले असून, तिथे फक्त एकच माणूस प्रवेश करू शकेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. औरंगजेबाच्या कबरीचा मुख्य दरवाजा पोलिसांकडून बंद करण्यात आला आहे. एकाचवेळी मोठा मॉब आता प्रवेश करू शकणार नाही अशी व्यवस्था करण्यात आली आहे.



औरंगजेबाच्या कबरीजवळ जाण्यासही मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता औरंगजेबाच्या कबरीची पाहाणी बाहेरूनच करावी लागणार आहे.

दरम्यान यावर प्रतिक्रिया देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटलं की जो औरंगजेब स्वराज्यावर चालून आला त्याची कबर इथेच बनली, हा इतिहास जगाला कळायला पाहिजे. आम्ही कुणाच्याही विरोधात जाणार नाही, मात्र हे सरकार बजरंग दलाचं आहे. कोरटकरांच्याविरोधात बजरंग दल आंदोलन का करत नाही? अबू आझमी, सोलापूरकर यांच्या विरोधात बजरंग दल आंदोलन का करत नाही? असा सवाल यावेळी दानवे यांनी उपस्थित केला आहे.

# पत्रकार संघाच्या वतीने बीड जिल्हा रुग्णालयाला साड्या आणि लहान मुलीस ड्रेस भेट



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार,तुरे, शाल, पुष्पगुच्छ न स्वीकारता जिल्हा रुग्णालयामध्ये ज्या माता कन्येला जन्म देतील त्या कन्येचे आणि त्या मातेचे जिने कन्यारत्न दिले त्यांचे स्वागत करण्यासाठी त्या मातेला साडी चोळी भेट देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी केलेल्या आवाहनाला साथ देत महाराष्ट्र राज्य

(उर्वरीत पान २ वर)

### ६ जानेवारी दर्पण दिन पत्रकार संघाने दत्तक घेतला

यापुढे दर ६ जानेवारी मराठी दर्पण दिनाचे औचित्य साधून यादिवशी बीड जिल्हा रुग्णालयात ज्या माता कन्येला जन्म देतील त्या मातेला साडी चोळी आणि त्या चिमुकलीला ड्रेस कायम देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीड आणि जगदविवेक प्रतिष्ठानच्या वतीने देण्याचा निर्णय पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अशोक थोरात यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जाहीर केला.याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# संपादकीय

## उदरभरण नोहे

ही समस्या केवळ पोषणाच्या अतिरेकातून उद्धवलेली नाही. चुकीचा आहार आणि बेजबाबदार जीवनशैली ही त्यामागची मूळ कारणे आहेत...

जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरण्याचे भारताचे स्वप्न पूर्ण होईल तेव्हा होईल, पण सध्या तरी आपण जगातले दुसऱ्या क्रमांकाचे स्थूलराष्ट्र ठरलो आहोत. स्थूल– म्हणजे ग्राम्य शब्दांत लठ्ठ– लोकांची संख्या भारतात वाढते आहे. 'लॅन्सेट' या आरोग्यविषयक शोधपत्रिकेने एका अहवालाचा हवाला देऊन, १८ कोटी भारतीय स्थूल असल्यावर शिक्कामोर्तब केले. म्हणजे या बाबतीत महासत्ता अमेरिकेलाही (१७ कोटी २० लाख) मागे टाकले आहे. आता आपल्यापुढे केवळ एकच देश आहे– चीन (४० कोटी). किमान या क्षेत्रात आपण आपल्या शेजाऱ्याला यातल्या काही निकषांवर तरी लवकरच धूळ चारू, अशी शक्यताही या अहवालाने वर्तवली आहे. २०५० पर्यंत भारतातील एकतृतीयांश लोकसंख्या स्थूलतेचा सामना करत असेल, असा इशाराही हा अहवाल देतो. त्यामुळेच स्थूलता ही आपल्याला समस्या वाटत नसली तरीही ती गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

आपण पिढ्यानपिढ्या स्थूलतेला समृद्धीचे लक्षण मानत आलो, मात्र ही समस्या केवळ पोषणातिरेकातून उद्धवलेली नाही. चुकीचा आहार आणि बेजबाबदार जीवनशैली ही त्यामागची मूळ कारणे आहेत. शिवाय ही तथाकथित समृद्धीही सर्वत्र समप्रमाणात विभागलेली नाही. तसे नसते, तर आज देशात सरकार अन्नधान्य मोफत वाटत असूनही ३५.५ टक्के बालकांची वाढ खुंटली नसती आणि ३२.१ टक्के बालकांचे वजन उंचीच्या आणि वयाच्या मानाने कमी भरले नसते. केवळ कर्बोदके म्हणजे संपूर्ण आहार नाही आणि जनतेचे पोट भरले म्हणजे इतिकर्तव्य पार पडले, असेही नाही हे आता सरकारला स्वीकारावे लागेल. भारतात पीक–पाणी आणि ऋतुमानात एवढे वैविध्य आहे की काय, किती, कधी खावे याचे विशिष्ट सूत्र असणे शक्य नाही. पण खाद्यासंस्कृतीत विविधता असली, तरी आरोग्याचे तीनतेरा वाजवण्याच्या इच्छेत मात्र देशभर एकात्मता दिसते.

त्यात भर पडते ती व्यायामाच्या अभावाची. घरकाम, शेतावरचे काम, धावपळ यालाच व्यायाम समजून समाधानी राहण्याची वृत्ती सार्वत्रिक आहे. शरीरातील प्रत्येक सांध्याला, स्नायूला, हृदयाला, मेंदूला योग्य प्रकारे, योग्य प्रमाणात आणि पुरेसा काळ चालना मिळाली, योग्य आहार आणि विश्रांती मिळाली, तरच त्याला व्यायामाचा खरा लाभ मिळतो, मात्र आठ तास संगणकासमोर आणि उरलेला वेळ मोबाइलसमोर अशी बैठी जीवनशैली आजच्या स्थूलतेच्या उद्रेकामागचे महत्त्वाचे कारण आहे. जिथे शाळेपासूनच शारीरिक शिक्षणाचा तास हा इतर विषयांचा अभ्यास संपवण्यासाठी आहे, असे बिंबवले जाते, त्या देशातील नागरिकांकडून एवढी अपेक्षा कुठे करणार? व्यायामाला प्रोत्साहन देण्याचे आपले सरकारी प्रयत्न नाक्यानाक्यांवर उभारलेल्या आणि बहुतेकदा सहा महिन्यांत निरुपयोगी ठरणाऱ्या तकलादू खुल्या व्यायामशाळांपलीकडे जात नाहीत. खेळाचे मैदान या शीर्षकाखाली राखीव ठेवलेल्या जागांवर सहज अतिक्रमणे होतात. सायकल किंवा जॉगिंग ट्रॅक हे केवळ पालिकेच्या निवडणुकीवेळी जाहीरनाम्यात दिसतात. गल्ल्या पार्किंगने गिळंकृत केलेल्या असतात आणि पदपथ तर फेरीवाल्यांसाठीच बांधले जातात. जिम वा स्पोर्ट्स क्लबचे सदस्यत्व ज्याला परवडते त्यांनीच व्यायामाची चैन करावी, उरलेल्यांनी योगदिन वगैरेची वर्षभर वाट पाहावी, असेच एकंदर धोरण दिसते. अर्थात इच्छाशक्ती असणारे अशा प्रतिकूलतेवर मात करण्याचे मार्ग शोधून काढतात; पण त्यांचे प्रमाण १४० कोटींमध्ये अत्यल्पच. अशात आपल्या खाण्याच्या सवयींनी अशी काही वळणे घेतली आहेत की कटिप्रदेशही गरगरीत होऊ लागले आहेत.

या खाद्याबदलाचा दोष शहरीकरणाला किंवा शहरांमधून वाढत गावोगावी पोहोचलेल्या पुरवठा साखळ्यांना देण्यापेक्षा भारतीयांच्या बेदरकार भाबडेपणाला द्यायला हवा. विविध देशांची खाद्यासंस्कृती जाणून घेणे चांगलेच. पण चायनीज आणि पिझ्झा हे केवळ चविष्ट आणि स्वस्त आहे, म्हणून आपण ते रोजच्या आहारात आणणार असू तर धन्यच. पोहे, उपमा, इडली, पराठ्यांऐवजी दररोज सकाळी रेडिमेड सिरिअलची पाकिटे दुधाच्या वाडग्यात रिती केली तर गडबड होणार, हेही निश्चित. नवे ते हवे असले तरी आपल्या कुटुंबव्यवस्थेतली कामाची विभागणी मात्र बहुश: पारंपरिकच राहिली आहे. स्वयंपाकघरात रोज घड्याळाच्या काट्यावर रंगणाऱ्या थरारक सामन्यांत खेळाडू म्हणून उतरण्याची संधीच पुरुषांना नाकारली जाते. एवढ्या प्रचंड वर्गाला परावलंबी ठेवणारी ही व्यवस्था घरोघरी मोडून काढली गेली तर, निखळणारे अनेक दुवे सांधले जातील. स्वयंपाकघरातील मनुष्यबळ दुप्पट होईल आणि काम निम्मे. पाकीटबंद पदार्थ कमी, पोषण अधिक. मोकळा वेळ वाढेल, तो कदाचित व्यायामासाठी सत्कारणी लागेल.

# मृत्यूनंतरही समाजसेवेचे व्रत - कर्मयोगी अरविंदराव देशमुख यांचे प्रेरणादायी देहदान

नवी दिल्ली /प्रतिनिधी

समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या आठवणी कधीच पुसल्या जात नाहीत. त्यांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांचा प्रेमळ स्पर्श कायम राहतो. अशाच एका समाजसेवी कर्मयोगीला–अरविंदराव देशमुख यांना–भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना मन भरून येते.


कर्तृत्व, सेवा आणि माणुसकीचा वारसा

यवतमाळच्या सुपुत्र असलेल्या अरविंदराव देशमुख यांचे संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित होते. साधी राहणी, कुटुंबासाठी निस्वार्थी प्रेम आणि समाजासाठी अथक झटणारा एक कर्मयोगी अशी त्यांची ओळख होती.

रंगपंचमीच्या मंगलदिनी, १४ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ४:४५ वाजता त्यांनी या जगाचा निरोप घेतला. मात्र, त्यांची शिकवण, विचार, आणि त्यांचा निस्वार्थी सेवाभाव आजही आपल्याला प्रेरणा देतो. त्यांचे कार्य केवळ त्यांच्या आयुष्यातच नव्हे, तर मृत्यूनंतरही अजरामर राहिले. त्यांनी समाजासाठी आपल्या शरीराचे दान करून एक अमूल्य सेवा केली आणि माणुसकीचा खरा अर्थ दाखवून दिला.

साध्या पण महान जीवनाचा प्रवास

अरविंदराव मामा हे साधेपणाचे मूर्तिमंत उदाहरण होते. कुर्ता– पायजमा हा त्यांचा पारंपरिक पोशाख, सतत लोकांच्या मदतीसाठी तत्पर असणारा त्यांचा स्वभाव, आणि कुटुंबासाठी अमर्याद प्रेम – हे सारेच त्यांना एक विलक्षण आदर्श व्यक्तिमत्त्व बनवत होते. त्यांच्या जाण्याने जणू एक तेजस्वी प्रकाश काळाच्या पडद्याआड गेला, आणि त्यांच्या कुटुंबासाठी प्रेम, आधार आणि आनंदाचा रंग फिका झाला.



देहदान – समाजसेवेचा सर्वोच्च टप्पा

मरणानंतरही अजरामर राहायचे असेल, तर देहदान करा! हा विचार त्यांनी आयुष्यभर जोपासला आणि त्यावर विश्वास ठेवला. मृत्यूपूर्वीच त्यांनी आपल्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना आपल्या शरीराचे दान करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या इच्छेनुसार, १५ मार्च २०२५ रोजी कोणतेही धार्मिक विधी न करता त्यांचे पार्थिव श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे दान करण्यात आले.

देहदानाचे महत्व आणि समाजातील जागरूकता...

भारतीय संस्कृतीत दानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अन्नदान, वस्त्रदान, रक्तदान यांसारख्या दानांप्रमाणेच देहदान हे सर्वांत श्रेष्ठ दान मानले जाते. त्याचे अनेक फायदे आहेत –वैद्यकीय शिक्षणासाठी उपयुक्त: वैद्यकीय विद्यार्थ्यांना मानवी शरीराचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळते.

संशोधनाला मदत: विविध.... आजारांवरील उपचार शोधण्यासाठी आणि नवीन शस्त्रक्रिया पद्धती विकसित करण्यासाठी देहदान उपयुक्त ठरते.नेत्रदान व अवयवदानाचा विस्तार: काही प्रकरणांमध्ये नेत्रदान व अवयवदानाद्वारे गरजू रुग्णांचे प्राण वाचवता येतात.समाजसेवेचा सर्वोच्च प्रकार: मृत्यूनंतरही समाजासाठी उपयोगी पडण्याची संधी ही माणुसकीचे प्रतीक आहे.

समाजासाठी प्रेरणादायी आदर्श

अरविंदराव देशमुख यांचे जीवन म्हणजे एक आदर्श शिकवण आहे. त्यांचे विचार, त्यांची कार्यपद्धती आणि त्यांची तळमळ ही आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या देहदानाच्या निर्णयाने समाजात सकारात्मक जागरूकता निर्माण केली आहे.

समाजासाठी एक संदेश – देहदान स्वीकारा

आजही अनेकांना देहदानाबाबत गैरसमज असतात. काही जणांना वाटते की धार्मिक विधींसाठी मृतदेह आवश्यक असतो. मात्र, संत–महात्म्यांपासून अनेक महान व्यक्तींनी देहदानाचे समर्थन केले आहे. मरणानंतरही समाजाच्या उपयोगी पडण्याची संधी मिळते, ही कल्पनाच अत्यंत प्रेरणादायी आहे.

अरविंदराव देशमुख यांच्या या महान निर्णयाने समाजाला देहदानासारख्या सेवाभावी कार्यासाठी जागृत करण्याचे काम केले आहे. यामुळे अनेक कुटुंबे त्यांच्या मृत नातेवाईकांच्या अंतिम इच्छेचा सन्मान करतील आणि समाजासाठी सकारात्मक उदाहरण निर्माण करतील.

एक अमर प्रकाश – सदैव प्रेरणादायी

अरविंदराव देशमुख आज आपल्यात नाहीत, पण त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रकाश कायम राहील. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

अंतिम क्षणापर्यंत समाजासाठी झटणारा हा माणूस, मृत्यूनंतरही हजारो लोकांच्या आयुष्यात प्रकाश टाकून गेला!

भावपूर्ण श्रद्धांजली!



# दिव्यतेची अनुभूती !

वडवणी /प्रतिनिधी

प्रसिद्ध भारतीय आध्यात्मिक गुरु आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री.श्री.रवीशंकरजी यांचे आशीर्वाद घेतले.ध्यान आणि योग यावर आधारित कार्य करत असताना यातून लोकांना आनंद आणि शांती मिळवण्यासाठी त्यांचे प्रयत्न असतात.जगभरातील १५२ देशांमध्ये ही संस्था कार्यरत असून स्वयंसेवकांच्या माध्यमातून अनेक समाजपयोगी कामे आर्ट ऑफ लिव्हींगच्या माध्यमातून केले जातात.

माजलगाव मतदारसंघात गाव तिथे वृक्ष लागवड हा सामाजिक उपक्रम आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून सुरू करण्यात येणार असून याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदारसंघाच्या वैभवात भर पाडणारे अनेक नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम मतदारसंघात राबवण्यासाठी नक्कीच संस्था मदत करेल अशी सकारात्मक भावना गुरुजींनी व्यक्त केली.दी आर्ट ऑफ लिव्हिंग आंतरराष्ट्रीय व्यक्ती विकास केंद्र, बँगलोर (भारत ),परम पूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकर जी यांच्यासोबत ध्यान, ज्ञान, सत्संग आनंद घेतला.तसेच व्यक्ती विकास केंद्र बद्दल बीड जिल्ह्यातील माजलगाव, धारूर व वडवणी येथे चालु असलेल्या आर्ट ऑफ लिव्हिंग ततघख सामाजिक प्रकल्प यांच्या माध्यमातून, महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग, बीड यांच्या सहकार्यातून जलयुक्त शिवार २.० मोहीम अंतर्गत गतवर्षी झालेल्या व यावर्षी चालु करण्यात येणाऱ्या कार्याची चर्चा करण्यात आली.

यामध्ये, माजलगाव मतदारसंघात प्रामुख्याने नाला खोलीकरण व रुंदीकरण, जलतारा सामाजिक प्रकल्प, वृक्ष लागवड, गोशाळा, श्री श्री रविशंकर विद्या मंदिर स्कुल या सर्व प्रकल्पावर सकारात्मक चर्चा संपन्न झाली.या सर्व कामांना प.पू. गुरुदेव श्री श्री रविशंकर जी यांचा आशीर्वाद मिळाला.माजलगाव, धारूर व वडवणी तालुक्यात या सर्व कामांचा शुभारंभ लवकरच सुरु होईल.

# राज्यस्तरीय एम टी एस परीक्षेमध्ये मराठवाड्याचे वर्चस्व

**राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये २० पैकी ११ विद्यार्थ्यांचा समावेश तर कृष्णराज चव्हाण,आर्यन कावळे, आर्यन मुंडे हे राज्यातून सर्वप्रथम**

केज/प्रतिनिधी

सध्याच्या या स्पर्धेच्या युगात स्पर्धा ही इतरांशी न करता स्वतःशीच करावी लागणार आहे. म्हणून पालक अगदी लहान वर्गापासून विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर वाढवा म्हणून विविध स्पर्धा परीक्षेला आपल्या पाल्यांना बसवत आहेत. तेंव्हा मागील पंचेवीस वर्षापासून महाराष्ट्रामध्ये जळगाव येथील शासन मान्य एमटीएस राज्य स्तरीय स्पर्धा परीक्षा आयोजित केली जाते. दरवर्षी या परीक्षेला जवळपास पन्नास हजार पेक्षा अधिक विद्यार्थी बसतात.या वर्षीही ही परीक्षा संपूर्ण महाराष्ट्रात दि.१९ जानेवारी २०२५ रोजी पार पडली.तसेच दि.४ मार्च रोजी या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यापरीक्षेमध्ये मराठवाड्या तील विद्यार्थ्यांनीघवघवीत यश संपादन केले.एकूण २० पैकीमराठवाड्यातील ११ विद्यार्थी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये आले आहेत.यामध्ये चव्हाण कृष्णराज स्वप्नील इ.४थी डी.व्ही.एम.स्कूल पुयानी, नांदेड राज्यातून सर्वप्रथम कावळे आर्यन अंजनराव इ.६ वी छत्रपती संभाजी राजे ग्लोबल स्कूल अंबाजोगाई राज्यातून सर्वप्रथम,मुंडे आर्यन अंगद इ.७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज बीड राज्यातून सर्वप्रथम, वाधवानी नमिश रितेश इ.२ री संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल, लातूर राज्यातून सर्व द्वितीय,कापसे सिद्धांत संदिप इ.२ री योगेश्वरी नूतन विद्यालय प्राथमिक विभाग अंबाजोगाई, राज्यातून सर्व तृतीय,चुंगे सार्थक संतोष इ.३ री ओरियन इंग्लिश मीडियम स्कूल,उमरगा राज्यातून सर्व द्वितीय,भोसले समर्थ तुळशीदास इ.३री ग्रीनलँड स्कूल धाराशिव, राज्यातून सर्वतृतीय,माटे सिद्धी बालाजी इ.४ थी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव,राज्यातूनचौथी, दांगट श्वेता रंजीत इ.६ वी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव,राज्यातूनचौथी, मोदानी तेजस रुपेश इ.७ वी अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव राज्यातून सर्व तृतीय,जाधव संस्कृती सिद्धेश्वर इ. ७ वी वाशी, राज्यातून सर्व तृतीय आली आहे.

केज तालुक्यातील विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

ही राज्यस्तरीय एमटीएस परीक्षा केज तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि.१९ जानेवारी २०२५ रोजी पार पडली.या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.यामध्ये गायकवाड सई नवनाथ इ.२ री शारदा इंग्लिश स्कूल केज केंद्रातून सर्व प्रथम,धवलशंकर वेदिका विनायक इ.३ री स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून सर्वप्रथम,शिंदे स्वप्नील राहुल इ.३ री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाधवजवळा केंद्रातून द्वितीय,सय्यद सिद्दीक जब्बार इ ३ री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी केंद्रातून तृतीय, भांडवलकर अनुष्का दत्ता इ.३ री स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून चौथी,शिंपले प्रथमेश गणेश इ.३ री केंद्रातून चौथा,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी केंद्रातून चौथी,मुळे पुजा बालासाहेब इ.३ री केंद्रातून चौथी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा उमरी केंद्रातून चौथी,बरुरे प्रथमेश संजय इ.४ थी शारदा इंग्लिश स्कूल केज केंद्रातून सर्व प्रथम,पंडित सोमराज संजय इ.४ थी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून द्वितीय,सत्वधर श्रवण अविनाश इ.४ थी स्वामी विवेकानंद

राज्यस्तरीय एम टी एस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी



विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून तृतीय, ढाकणे अंश बबन इ.६ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून सर्वप्रथम, मुंडे आर्यन अंगद इ.७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज राज्यातून सर्वप्रथम, चाटे ओमकार सूर्यकांत इ.७ वी स्वामी विवेकानंद विद्या मंदिर प्राथमिक विभाग केज केंद्रातून द्वितीय आला आहे.

सदरील परीक्षेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून असंख्य विद्यार्थी बसवले जातात. या परीक्षेच्या यशस्वीते साठी लातूर येथील मराठवाडा विभागीय प्रमुख शंभुलिंग विश्वनाथ अप्पा नागुरे तर प्रत्येक तालुक्याच्या नियोजना साठी तालुका समन्व्यक प्रतिनिधी म्हणून कार्य करतात.केज तालुका प्रतिनिधी बी.एम.टिंगरे, अंबेजोगाई तालुका- एस. यु.राऊत, बीड तालुका- व्हि.डी.जोशी,धाराशीव तालुका- येडके सर, उमरगा तालुका–पद्माकर मोरे आदी तालुका समन्वयक म्हणून काम पाहतात.या शासनमान्य राज्यस्तरीय एम.टी.एस. परीक्षेला तालुक्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने बसावे. तसेच पुढील वर्षापासून ग्रामीण व शहरी असे दोन भाग करून ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे अशी माहिती एम.टी.एस.केज तालुका समन्वयक श्री.टिंगरे बी. एम.यांनी दिली.

## पान १ वरून..

**वन्य प्राण्यांच्या..**

दररोज होत आहेत. या तालुक्यातील काही धाबे चालकां बरोबरच या भागातील शिकाऱ्यांना स्थानिक पोलीस चौकी मधिल काही पोलिस कर्मचाऱ्यांचे हितसंबंध असल्याचे नागरिकात बोलले जात आहे .याचा परिणाम वन्य प्राण्यांच्या शिकारी बरोबरच ग्रामीण भागात दिवसेंदिवस गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे.यासंदर्भात जिल्हा पोलीस प्रशासनाने प्रत्येक तालुक्यातील व तालुक्यातील स्थानिक पोलिसांच्या तडकाफडकी अन्यत्र बदल्या करण्यात याव्यात व वनविभागाद्वारे आणि राज्य दारु बंदी विभागाद्वारे या तिन्ही तालुक्यातील धाबा संस्कृती ची सातत्याने झाडाझडती घेण्याची मोहीम राबवी अशी मागणी गावोगावच्या नागरिकाद्वारे केली जाऊ लागली आहे.

**फडणवीस औरंगजेबाइतकेच ...**

सपकाळ म्हणाले की, औरंगजेब हा क्रुर विचाराचा होता. त्यांने स्वत:च्या वडीलांना जेलमध्ये टाकले. स्वत:च्या मोठा भाऊ जो संविधानाच्या विचाराचा होता दाराशिखा याचा खून केला.खूनच केला नाहर तर त्यांचे मुंडके कापून पूर्ण दिल्लीमध्ये फिरवले. लहान भावाला पागल म्हणत विषप्रयोग करत त्यांची हत्या केली. औरंगजेब सदा कदा धर्माच आधार घेत होता. तो कधीच हजला गेला नाही.हा क्रुर शासक होता. आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रुर शासक आहेत. तेही धर्माच आधार घेत आहेत. मात्र संतोष देशमुख सारख्या हत्या होत आहे. जिथे खासदारांच्या लेकी बाळी सुरक्षात नाही. हा प्रकार दुर्दैवाने महाराष्ट्रात सुरू आहे. औरंगजेब आणि देवेंद्र फडणवीस यांचा कारभार एक सारखाच आहे. औरंगजेबाची कबर ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाची साक्ष आहे. क्रूर प्रवृत्तीच्या माणसाला आम्ही गाडतो, हे त्या ठिकाणी दिसून येते. औरंगजेब हा क्रूर शासक होता, देवेंद्र फडणवीस देखील तेवढेच क्रूर आहेत. ते धर्माचा आधार घेत आहेत. औरंगजेबाची कबर उचलून टाका, असे सांगत आहेत. याचा अर्थ त्यांना मराठी माणसांचा, मावळ्यांचा आणि शिवाजी महाराजांचा इतिहास पुसून टाकायचा आहे.

भाजपमध्ये राहू नये

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, शिवाजी महाराजांचा अपमान केला जात आहे, तुम्ही राजीनामा द्यावा, असे म्हणत त्यांनी शिवेंद्रराजे भोसले यांच्यावर निशाणा साधला. तर तुम्ही ज्या पक्षात आहात तो पक्ष शिवाजी महाराजांच्या विचारांच्या विरोधात आहे. तुम्ही या पक्षात राहू नये.

**सुरेश धसांनी 'खोक्या'च्या ....**

भाजप आमदार सुरेश धस यांनी खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या कुटुंबियांची भेट घेतली.

बीडच्या शिरूरमध्ये मारहाण प्रकरणी आणि प्राण्यांच्या शिकार केल्याच्या आरोपाखाली खोक्या उर्फ सतीश भोसले याच्यावर गुन्हा दाखल आहे. बीड पोलिसांनी त्याला अटक केलेली आहे. या कारवाईनंतर

## पान १ वरून..

१३ मार्च रोजी वन विभागाने सतीश भोसलेच्या घरावर बुलडोझर चालवत त्याचे घर पाडले.. सतीश भोसलेचे घर वन खात्याच्या जमिनीवर अवैधरित्या बांधल्याचे कारण देत वन विभागाने ही कारवाई केली. त्यानंतर रात्रीच्या वेळी हे पाडलेले घर अज्ञातांनी पेटवून दिले. यामध्ये काही जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या. पोलिसांनी सतर्कता दाखवत ही आग विझवली. तर या ठिकाणी असलेल्या काही महिलांना मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला होता.

खोक्या उर्फ सतीश भोसले हा भाजप आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार सुरेश धस यांनी आज सतीश भोसलेच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. सुरेश धस यांना पाहताच सतीश भोसलेच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते.

**बीडमधील शिक्षक ....**

सदैव काम करीत असतात. त्यांचे प्रश्न व अडचणी शासनाने समजून घेतल्या पाहिजेत. शासनाने त्यांच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मक व संवेदनशीलतेने विचार करण्याची गरज आहे. शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सुटले तर अशा घटना घडणार नाहीत. दिवंगत शिक्षक धनंजय नागरगोजे यांना न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने पुढाकार घ्यावा, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. बीडमधील नागरगोजे यांच्या आत्महत्येबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला.

बीड जिल्ह्यातील धनंजय नागरगोजे या शिक्षकाची आत्महत्या अतिशय दुःखद आणि दुर्दैवी घटना आहे. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात तळागाळातील जनतेपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी आयुष्य वेचले. त्याच महाराष्ट्रात शिक्षकाला आत्महत्येचा २० हजार शिक्षकांना कोणतेच अनुदान नाही

दरम्यान, राज्यभरात ३५०० विना अनुदानित शाळेत ७० हजारांपेक्षा जास्त शिक्षक आहेत. त्यातील ७०० शाळेतील २० हजार शिक्षकांना अजून कोणतेच अनुदान नाही. तर उर्वरित शिक्षकांना २० टक्के ते ८० टक्के दरम्यान अनुदान मिळते. पण, पुढचे टप्पे वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे, विना अनुदानित व टप्पा अनुदानित शिक्षकांकडून सातत्याने शासन दरबारी मागणी केली जात आहे.

**धनंजय देशमुखांनी...**

की, आरोपींना वाचवले पाहिजे. तुम्ही आरोपीला वाचवण्याची तयारी करत असाल तर तुमचा विनाश हा जगजाहीर आहे, असा इशारा धनंजय देशमुख यांनी दिला.

आम्ही न्यायाच्या प्रतिक्षेत

आमच्या देशमुख कुटुंबावर कुठलेही आरोप नाहीत आम्ही फक्त न्याय मागत आहोत. आम्ही कोणत्याही चुकीच्या गोष्टीचे समर्थन करत नाहीत. २६ मार्च ही न्यायालयाने या प्रकरणात तारीख दिली आहे, आम्ही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे धनंजय देशमुख यांनी म्हटले.

## पान १ वरून..

दरम्यान, राज्यभर चर्चेचा विषय ठरणाऱ्या संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींना मकोका कायदा अंतर्गत अटक करण्यात आली आहे. तसेच वाल्मीक कराडवर खंडणीसह इतर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सीआयडीने न्यायालयात आरोपपत्र देखील दाखल केले. या प्रकरणाच्या सुनावणीकडे आता राज्याचे लक्ष होते. या प्रकरणाची पहिली सुनावणी चार दिवसांपूर्वी संपली. आता पुढील सुनावणी २६ मार्चला होणार आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्याशी असलेल्या संबंधावरून धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**गरिबांच्या फ्रीजला वाढती ....**

उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असून शहाळे उसाचा रस लिबू सरबत ज्युस आईस्क्रीम लस्सी विक्रेत्यांकडे गर्दी वाढत आहे उन्हामुळे शरीराचे तापमान थंड ठेवण्यासाठी मातीच्या माठाला मागणी वाढली आहे मातीचा माठ दिडशे रुपये ते तीनशे रुपयेपर्यत दर आहे वाढत्या उष्मात गारवा देणारे थंडगार पाणी राहण्यासाठी मातीच्या माठशिवाय पर्याय नाही त्यामुळे गरिबांच्या फ्रीजला श्रीमंत लोकांचीही मागणी वाढली आहे

**पत्रकार संघाच्या वतीने ...**

पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा शाखेच्या वतीने साडी आणि चिमुकल्या मुलींसाठी ड्रेस भेट स्वरूपात देऊन जिल्हाशलचिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांचे अनोखे अभिष्टचिंतन करण्यात आले.

बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी बीड येथे पदभार घेताच बीड जिल्ह्यातील मुलींचा दर वाढावा यासाठी विविध उपाय योजना आणि त्यानुसार जनजागृती प्रित्यर्थ आवाहन सुरू केले. त्याचाच भाग म्हणून त्यांनी त्यांच्या स्वागताला येणाऱ्या मान्यवरांना विनंती करत हारतुरे न देता साडीचोळी भेट देण्याचे आवाहन केले होते.त्या आवाहनानुसार ५०० पेक्षा अधिक साड्या जिल्हा रुग्णालयात जमा झाल्या. सदरील आवाहनाला मिळालेल्या प्रतिसादानंतर त्यांनी १४ मार्च रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित हारतुरे, शाल, श्रीफळ न स्वीकारता पुन्हा एकदा साड्या भेट देण्याचे आवाहन केले. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने त्यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून ज्या माता कन्येला जन्म देतील त्या मातेला साडी आणि त्या जन्मदात्या चिमुकलेला ड्रेस प्रातिनिधिक स्वरूपामध्ये भेट म्हणून देण्यात आला.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष शेख ताहेर,महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा,बीड जिल्हा संघटक रईस खान,उपाध्यक्ष दत्ता काटे, शहर उपाध्यक्ष बाळासाहेब कांबळे, काळजीवाहक शेख शाहेद सह इतर पदाधिकारी आणि ज्येष्ठ नेत्या शैलाताई मुसळे यांची विशेष उपस्थिती होती.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड –४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# रिझर्व्ह बँके कडून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस नवीन तीन शाखांना परवानगी

## निलंगा , मुरुड आणि केज याठिकाणी होणार पिपल्स बँकेच्या नवीन शाखा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

**अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस रिझर्व्ह बँकेच्या वतीने नवीन तीन शाखा कार्यान्वित करण्यास परवानगी दिल्याचे पत्र नुकतेच रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स बँकेस प्राप्त झाल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी दिली आहे. यावेळी बँकेचे संचालक प्रा वसंत चव्हाण,ॲड विष्णूपंत सोळंके, अरुण काळे, पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडू भाई दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे , प्रा वनमाला रेड्डी,सौ स्नेहा हिवरेकर, लक्ष्मण दासूद, सचिन बेंबडे हे उपस्थित होते. १९९६ साली अंबाजोगाई शहरातील व्यापारी तथा नागरिकांची निकड लक्षात घेऊनन अल्पशा भांडवलावर अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची स्थापना करण्यात आली होती. आज जवळपास सत्तावीस अठ्ठावीस वर्षात बँक ५३७ कोटीच्या ठेवी १९ कोटींच्या भांडवलावर २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले.**

सप्टेंबर २०२४ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल हे रू १८ कोटी आहे. बँकेचा स्वनिधी हा रुपये ४७ कोटी आहे. राखीव निधी हा १४ कोटी लाख रुपये एवढा आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमास आधीन राहून ग्राहकांना रु.३२८ कोटी एवढा कर्ज पुरवठा केला असल्याचे बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले. सप्टेंबर २०२४ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु २४३ कोटी एवढी आहे. मागील वर्षे अखेरीस बँकेस करपसच्यात ४ कोटी २० लाखांचा नफा होऊन ०% एन पी ए मिळवला असून लेखा परीक्षण अहवालात प्रतिवर्षी बँकेस अ दर्जा प्राप्त होत आहे. बँकेची ही उंच भरारी पाहता बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे मोदी यांनी नमूद केले.

अंबाजोगाई पिपल्स बँक ही आज वीस शाखांच्या द्वारे ग्राहकांना सेवा पुरवीत आहे . नुकत्याच आणखी दोन नवीन शाखां रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार अंबाजोगाई (चौसाळकर कॉलनी) व छत्रपती संभाजी नगर (सातारा परिसर) येथे सुरू केल्या आहेत. यापुढे पुणे (पिंपरी चिंचवड) व मुंबई याठिकाणी सुद्धा बँकेच्या शाखा सुरू करण्याचा मानस असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. बँकेने खढक्षेत्रात देखील ग्राहकांना तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी भरीव अशी कामगिरी केली आहे. डिजिटल बँकिंग च्या माध्यमातून UPI, IMPS, RTGS , ATM द्वारे ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असल्याने मोदी यांनी यावेळी नमूद केले. बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची ही पावतीच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी स्पष्ट केले.

मागील काळात अनेक आर्थिक संस्था डबघाईला येऊन दिवाळखोरी मध्ये निघाल्या. अनेक ठेवीदारांना याचा मोठ्या प्रमाणावर फटका सहन करावा लागला. मात्र अशाही परिस्थितीत अंबाजोगाई पिपल्स बँक ग्राहक ठेवीदार व सभासदांच्या विश्वासाच्या बळावर ताठ मानेने आपला डोलारा पुढे नेत असल्याचा अभिमान संस्थापक राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर देखील कर्जधारक ग्राहकांचा विचार करुन बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले. बँकेचे माननिय सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे बँक दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्याचे दिसून येत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी नमूद केले .

अंबाजोगाई पिपल्स बँक केवळ अर्थकारणच न करता वेळोवेळी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविले असते. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबीर , कोरोना योध्दा सन्मान, बँकिंग क्षेत्रात महिला जनजागृती अशा विविध सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनामुळे व ग्राहकांसाठीच्या नवनवीन उपक्रमामुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली आहे. यापुढेही अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला .

# शितलताई चाटे लेडी सिंघम यांचा बीड शहर बचावच्या वतीने नागरी सत्कार

बीड /प्रतिनिधी

महसूल प्रशासनातील लेडीज सिंघम शितलताई चाटे यांना रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष महिला प्रशासकीय अधिकारी पुरस्काराने सन्मानित केले. याबद्दल'बीड शहर बचाव मंचाच्या' वतीने करण्यात आला. यावेळी मराठवाडा शिक्षक संघ,राष्ट्रीय काँग्रेस पार्टी, बीड जिल्हा कम्युनिस्ट पार्टी, भाजपा ओबीसी सेल,आधार व्यसनमुक्ती सेवा केंद्र, एसटी कामगार संघटना, संपादक व पत्रकार बांधव, जिल्हा वकील संघ, महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी,मातृभूमी प्रतिष्ठान व शहरातील जेष्ठ मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



यावेळी बीड शहर बचाव मंचचे निमंत्रक नितीन जायभाये तसेच मातृभूमी प्रतिष्ठानचे सुरेश तांदळे, मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष,सचिव ज्येष्ठ कॉम्रेड डी. जी. तांदळे सर, बीड जि.कम्युनिस्ट पार्टीचे सचिव भाऊराव प्रभाळे, महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे मा.सुधीर देशमुख, विजेंद्रसिंह डुलगच,बाजीराव भाऊ ढाकणे, परवेज कुरैशी, टाटा सेठ,ड.अविनाश बारगजे, ड. नितीन वाघमारे, अशोकराव येडे, तेजसभाऊ घुमरे, संजय भडगळे, किशोर लोखंडे, महादेव जायभाये, गायकवाड, पत्रकार बालाजीभाऊ जगतकर, लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने भागवत वैद्य,माजी नगरसेवक सुनीलभाऊ महाकुंडे, भुषणभाऊ राठोड,सेवा नि.प्राचार्य भास्करराव मिसाळ, शहरातील आदी मान्यवर, नागरिक, अधिकारी, कर्मचारी व पत्रकार बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजच्या शहर अंतर्गत महामार्गावरील यूटर्न वर पडलेले कटाव कंपनीने न भरल्यास बुधवारी रस्ता रोको

केज/प्रतिनिधी

केज शहरात अंबेजोगाई -मांजरसुंभा महामार्गावर पिसाटी नदी पूल ते मधूबन हॉटेल पर्यंतच्या रस्ता दुभाजकावर असलेले यूटर्न सिमेंटने भरले नसल्याने या यू टर्न वर धोकेदायक कटाव निर्माण



झाल्याने दुचाकी व इतर छोटी वाहने वळण घेताना अपघातग्रस्त होत आहेत.विद्यार्थी,महिलांना अशा यू टर्न वरून रस्ता पार करताना त्रास होत आहे.हे कटाव तात्काळ भरण्याबद्दल एच पी एम कंपनीला केज विकास संघर्ष समितीने तोंडी व लेखी विनंती केलेली आहे.जर कंपनीने येत्या दोन दिवसात हे सर्व कटाव भरून घेतले नाहीत तर येत्या गुरुवार दि.२० मार्च रोजी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ बेमुदत रस्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.समिती याबाबतची अत्यावश्यक निवेदने कंपनी सह केजचे तहसिलदार यांनाही देत आहे.तरी कंपनीने या महामार्गावरील सर्व यूटर्न वरील कटाव सिमेंटने भरून घ्यावेत अशी मागणी समितीने केली आहे.निवेदनावर समन्वयक हनुमंतभोसले, नासेर मुंडे,शेषरावघोरपडे यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत आडसकर यांच्या खंदे समर्थकांचा राशप पक्षात प्रवेश

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील वरपगाव येथील रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक २० वर्ष सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन राहीलेले श्री. अंकुश नाना देशमुख व व्हाइस चेअरमन श्री. अंबरभाई शेख यांनी ॲड.बाबुराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे त्यामुळे केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार पडताना दिसत आहे अनेक वर्षे आडसकर गटा सोबत काम करणारे कार्यकर्ते रमेशराव आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत कारण आडसकर यांनी चिंचोलीमाळी जिल्हा परिषद अनेक वर्षे चालवली परंतु त्यांनाफार विकास त्यांना करता आला नाही.परंतुखासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाच वर्षे चिंचोली माळी जिल्हा परिषदेवर काम केले तसेच भरघोस विकास निधी चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दीला व आडसकर यांनी २५ वर्षात जो विकास चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये केला नाही त्यापेक्षा दुप्पट विकास खासदार बजरंग बप्पा सोनवणे चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मधुन निवडुन आल्यानंतर पाच वर्षांत केला आहे.त्यामुळे रमेश आडसकर यांच्या वर चिंचोली माळी सर्कल मधील जनता नाराज होऊन रविवारी रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक सुध्दा रमेश आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत त्यांचाच एक भाग म्हणुन अंकुश नाना देशमुख व अंबरभाई शेख यांनी रा.कॉ.प.शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला यावेळी उपस्थित लक्ष्मण देवकर,विनायक कापरे, बाबासाहेब नरहरी देशमुख,सुनिल देशमुख, संभाजी शितोळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ.विजयराजे पंडित साहेब नाथापुर-रंजेगाव-कवडगाव रोडची साधी दुरुस्तीही नाही - शांतिनाथ जैन

बीड/प्रतिनिधी

जिल्ह्यातील बीड गेवराई माजलगाव व वडवणी या चार तालुक्याच्या सिमेवर असणारा नाथापुर रंजेगाव कवडगाव हा प्रमुख जिल्हा मार्ग असणारा रोड अत्यंत खराब झाला आहे.नाथापुर ते रंजेगाव दरम्यानच्या रोडवर डांबरीकरण तर सोडाच साधी दुरुस्तीही करण्यात आली नाही. गेवराईचे तत्कालीन कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांचेकडे अनेकदा रोडबाबत निवेदने दिली परंतु त्यांनी साधी दखलही घेतली नाही. त्यामुळे हा रोड बेवारस बनला आहे. हा रोड गेवराई मतदार संघात येत असल्याने आ.विजयराजे पंडित साहेब आता तुमची जबाबदारी आहे. जनतेने तुम्हाला फार मोठ्या मताधिक्याने निवडुन दिलेले असल्यामुळे या भागातील जनता तुमच्याकडे आशेने पहात आहेत. असे मत शांतिनाथ जैन यांनी ग्रामस्थांच्या वतीने व्यक्त केले आहे.बीड जिल्ह्यातील बीड कुर्ला कुक्कडगाव आडगाव नाथापुर रंजेगाव कवडगाव पिंपरखेड वडवणी चिखलबीड हा जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्ग आहे. याचा क्र.१८असुन या रोडवर अद्याप ही कुणाचे ही लक्ष नाही.याचं जिल्हा मार्गावर नाथापुर रंजेगाव कवडगाव दरम्यान रंजेगाव फाट्यापर्यंत(शिव) हा रोड सा.बां.विभाग गेवराई कडे येतो. मात्र या दरम्यानच्या रोडची ईतकी दुरावस्था झाली आहे कि या रोडवरून पायी चालणेही मुश्किल झाले आहे. परिणामी या भागातील बीड कवडगाव ही बससेवा गेल्या ५ वर्षापासुन बंद पडलेली आहे.हा रस्ता पक्का असणे गरजेचे आहे. कारण याच रोडवरुन या भागातील जनतेला गेवराईशी संपर्क करण्यासाठी नाथापुर वाहेगाव आम्ला भेंडटाकळी जातेगाव फाटा मार्गे गेवराईशी संपर्क करता येतो. याच रोडवरुन गेल्या ५ वर्षापुर्वी धारूर आगाराने धारूर ते छत्रपती संभाजी नगर बस चालु केली होती. मात्र नाथापुर ते रंजेगाव दरम्यानचा रोड ईतका खराब झाला आहे कि रोडच्या दोहो बाजुंनी वेड्या बाभळीचे साम्राज्य पसरले आहे. तर रोडवर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे ही बससेवा बंद पडली. याबाबत या भागातील जनतेने तत्कालीन कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांना अनेकदा निवेदने दिली मात्र त्यांनी साधी दखलही घेतली नाही. आ.विजयराजे पंडित साहेब ही गावे मतदार संघाच्या शेवटच्या टोकाला जरी येत असली तरी ती मतदार संघातच आहेत. पिंपळादेवी सुर्डी ताडसोन्ना केसापुरी परभणी ही गावे ही शेवटच्या टोकाला आहेत. मात्र या गावाला रोड टकाटक आहेत मग नाथापुर रंजेगाव रोड साठीच दुजा भाव का ? असा सवाल या भागातील जनता करत आहे.तरी आमदार महोदय आपणच याकडे लक्ष देऊन हा रोड कायम मजबुत करण्यासाठी नाथापुर ते कवडगाव हद्द हा सिमेंट रोड करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

या भागातील रंजेगाव येथील सिंधफणा पात्रातुन आज पर्यंत अवैध वाळू उपसा होत होता वाळु वाहतुक करणारे हायवा टिप्पर या रोडवरून अहोरात्र चालत होते.त्यामुळेच या रोडची वाट लागली. परंतु बीडचे पो.अधिक्षक नवनीत कावत जिल्ह्यात रूजु झाल्यापासून ही अवैध वाळू वाहतूक कायमची बंद झाली आहे. त्यामुळे हा रोड मजबुत करण्यासाठी कुठलीही अडचण नाही.



# आ.सुरेश आण्णा धस यांच्या अध्यक्षतेखाली पाटोदा येथे आम सभा

## प्रलंबित प्रश्न लावले धसा...स

पाटोदा ।आजीज शेख

पाटोदा पाचयंत येथे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी पाटोदा पंचायत समिती येथे आम सभा संपन्न झाली. प्रसंगी उपस्थित सर्वांवांशी धस यांनी आपुलकीचा संवाद साधत माय बाप जनतेचे प्रश्न आमदार सुरेश आण्णा धस यांनी समजून घेतले. तसेच काही प्रश्न तात्काळ मार्गी लावले.

या आमसभेतून कृषी विभागासंदर्भात, घरकूला संदर्भात जनतेचे विविध प्रश्न निदर्शनास आले तसेच पंचायत समितीमधील मजूर कामे केवळ कागदावर आहेत. काही कामे रखडवण्यात आली आहेत. सरकारी कार्यालयातील विविध अधिकाऱ्यांबाबत ग्रामस्थांचा तक्रारी येत आहेत. सर्वसामान्य जनतेची कामे न रखडवता ती त्वरित मार्गी लावण्याच्या सूचना आ.सुरेश आण्णा धस यांनी उपस्थित अधिकारी वर्गाला आम सभेतून दिल्या.

आ.धस पुढे बोलताना म्हणाले की सरकारी योजना या समाजातील प्रत्येक घटकासाठी आहेत. या योजनांचा लाभ प्रत्येकाला झाला पाहिजे असे मत उपस्थित्तांशी बोलताना त्यांनी व्यक्त केले. शेतकऱ्यांसाठी शेत तलावाच्या दुरुस्तीचे आदेश आ.सुरेश आण्णा धस यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले असून दिव्यांग बांधवांना देखील त्यांच्या प्रलंबित निधी लवकरच मिळणार आहे. आसे आश्वासन त्यांनी यावेळी दिले यावेळी उपस्थितांशी बोलताना आमदार सुरेश आण्णा धस यांनी पुढच्या वर्षापासून प्रत्येक गावांसाठी स्वतंत्र आम सभा घेणार असल्याचे स्पष्ट केले. यामध्ये सर्वांचे प्रश्न ऐकून घेऊन ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाणार आहे. यावेळी तहसीलदार, तलाठी, विविध सरकारी कार्यालयातील सन्माननीय पदाधिकारी, जिल्हा परिषदचे आजी माजी सदस्य, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांची मराठी विषयाच्या प्राध्यापक महासंघाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड



जयभवानी महाविद्यालयात संस्थेकडून सत्कार

पाटोदा (प्रतिनिधी)

येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांची मराठी भाषा प्राध्यापक महासंघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. शिवजयंतीच्या अनुषंगाने मराठी भाषा विषय प्राध्यापक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा. सुनील डिसले, राज्य कार्याध्यक्ष प्रा.संपतराव गर्जे, राज्य कार्याध्यक्षा प्रा. डॉ.मनीषा रिटे व राज्यसचिव प्रा. बाळासाहेब माने यांच्या उपस्थितीत ही निवड घोषित करण्यात आली आहे. त्यांच्या निवडी बद्दल त्यांचा पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात जय भवानी शिक्षण संस्थेचे व जगदंबा शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा.श्री. प्रमोद गोरकर , संस्थेचे मुख्य लेखापाल मा.श्री.प्रतापराव हातोटे ,प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगेज्ञव संस्थेचे सहलेखापाल श्री.श्रीराम नाना शेळके यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.प्रा. डॉ अशोक देवगुडे यांची मराठी भाषा विषयाच्या प्राध्यापक महासंघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शिक्षण महर्षी मा.श्री. शिवाजीरावदादा पंडित,संस्थेचे अध्यक्ष तथाराष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार मा.श्री. अमरसिंह पंडित (भैय्यासाहेब)संस्थेचे सचिव मा. श्री. जयसिंह पंडित, आमदार मा.श्री. विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट क्लब चे कार्यवाह युवा नेते मा.श्री. रणवीर काका पंडित, युवा नेते पृथ्वीराजे पंडित,मा.श्री.अमृत डावकर सर,प्रा.काशीनाथ गोगुले, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे संचलन सुप्रसिद्ध नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी मानले.या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद सर्व शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विध्यार्थी उपस्थित

# जयश्री युवराज पिंपळेचे दुःखद निधन



परळी (प्रतिनिधी)

शहरातील जुन्या गावभागातील भोईगल्लीतील रहिवासी जयश्री युवराज पिंपळे (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.शहरातील भोईगल्लीतील रहिवासी जयश्री युवराज पिंपळे यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान शनिवारी (ता.१५) दुपारी २.४५ घ्या दरम्यान उपचार सुरू असताना निधन झाले.जयश्री पिंपळे या धार्मिक कार्यात हिरीरीने सहभागी होत असत. त्यांच्यावर शनिवारी सायंकाळी ८ च्या दरम्यान विरशैव स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. जयश्री पिंपळे यांच्या पश्चात पती युवराज, दोन मुले प्रदिप व सुजित, मुलगी अश्विनी, सासू, सासरे, नातवंडे असा परिवार आहे.शांतलिंग, चंद्रशेखर फुटके यांच्या त्या बहिण होत.

# कांशीराम यांचा आदर्श बहुजन कार्यकर्त्यांनी घ्यावा - चंद्रप्रकाश शिंदे

बीड ।प्रतिनिधी

मुक्ता सार्वजनिक वाचनालय बीड येथील कार्यालयात,बहुजन समाजातील क्रांतिकारक नेते , मा.कांशीराम जी यांची ९१वी जयंती साजरी करण्यात आली, या प्रसंगी , मा.कांशीराम जी यांच्या प्रतिमेस ,प्रा.डॉ.विठ्ठल जाधव , व श्री.विठ्ठल भोसले साहेब यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या प्रसंगी प्रमुख वक्ते चंद्रप्रकाश शिंदे यांनी कांशीराम साहेब यांच्या बहुजन चळवळीतील कार्य ,त्यांचे संघटन कौशल्य, शिस्तबद्धता, चळवळी बाबतीत निष्ठा व समर्पण यांची विविध




प्रसंग सांगून मनोगत व्यक्त केले. मुक्ता सार्वजनिक वाचनालय बीड, अध्यक्ष आयु.भाग्यविधाता साळवे ,यांनी त्यांच्या मनोगत मध्ये ,परिवर्तन हे होण्यासाठी ,आदर्श व्यक्तिमत्व डोळ्यासमोर ठेऊन कार्य केले पाहिजे, या वेळी मा.कांशीराम साहेब यांच्या सोबत चळवळीत कार्य केलेले ,कार्यकर्ते जे. टी.साळवे साहेब ,यांचा सत्कार करण्यात आला.सूत्रसंचालन हर्षरत्न साळवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रुती साळवे यांनी मानले.

# होळी व धुलिवंदनानिमित्ताने पोलिसांची विशेष मोहीम तळीरामांना दणका!

गडब/सुरेश म्हात्रे

होळी आणि धुलिवंदनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेने नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांविरोधात विशेष मोहीम राबवली. गुरूवारी व शुक्रवारी असे दोन दिवस राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेत वाहतुकीचे नियम मोडल्याप्रकरणी १७ हजार ४९५ चलन जारी करण्यात आले. त्याद्वारे चालकांना एक कोटी ७९ लाख रुपये दंड ठोठावण्यात आला.

होळी आणि धुलिवंदन उत्साहात साजरे करण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर एकत्र येतात. या काळात काही ठिकाणी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होण्याची शक्यता लक्षात घेऊन मुंबई वाहतूक पोलिसांमार्फत विशेष वाहतूक मोहीम

(स्पेशल ड्राईव्ह) राबविण्यात आली होती. या मोहिमेंतर्गत मद्यपान करून वाहन चालवणे, वेगमर्यादा ओलांडणे, हेल्मेटशिवाय दुचाकी चालवणे, दुचाकीवरून तिघांनी प्रवास करणे, तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात आली.

दोन दिवसांच्या या विशेष मोहिमेत शहरात विविध ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत दोन दिवसांमध्ये १८३ मद्यपी - चालकांवर कारवाई करण्यात आली. - होळी आणि धुलिवंदनानिमित्त शहरात

मद्यप्राशन करुन तसेच वाहतूक नियमांचे उल्लघंन करुन वाहन चालविण्याच्या घटना सर्रास घडतात. त्यामुळे दारू पिवून गाडी चालवणाऱ्यांविरुद्ध मुंबई पोलिसांसह वाहतूक पोलिसांनी गुरूवारी संध्याकाळपासूनच विशेष मोहीम हाती घेतली होती.सणासुदीच्या काळात दारु पिवून वाहन चालविणाऱ्या चालकांना नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. दोन दिवस केलेल्या कारवाईत एकूण १०७ वाहन चालकांवर कारवाई केल्याची माहिती वाहतूक शाखेने दिली.


राज्यात गुरुवारी होलिकोत्सव सण साजरा करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी धुलिवंदनानिमित्त ठिकठिकाणी रंगांची उधळण करण्यात आली. शहरात, समुद्रकिनारी तसेच ग्रामीण भागात गावे, वाड्यांमध्ये एकमेकांवर रंग उधळून उत्साहात धुळवड साजरी केली. दरम्यान, काही जण दारु पिवून वाहन चालवित असल्याचा प्रकार नवी मुंबई पोलिसांच्या निदर्शनास आला.

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत वेगवेगळ्या नाक्यांवर वाहतूक पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दरम्यान, दारु पिवून वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांना वाहतूक पोलिसांनी दणका दिल्याचे चित्र दिसून आले. दारु पिवून वाहन चालविणाऱ्या चालकांची तपासणी वाहतूक



पोलिसांकडून करण्यात आली. त्यावेळी १०७ जण त्यात सापडल्याने त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली.दोन दिवसांत नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करून १७हजार ४९४ चलन जारी करण्यात आले. त्यात दारू पिवून वाहन चालवल्याबद्दल १८३, विनाहेल्मेट दुचाकी चालवल्याबद्दल ४९४९, वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चार हजार ६५४, सिग्नल तोडल्याबाबत १९४२ ट्रीपल सीट दुचाकी चालवल्याबद्दल ४२५, नो एन्ट्रीमध्ये प्रवेश केल्याबाबत ९९२, विनाकारण हॉर्नचा वाजवल्याबाबत ४५, विरुद्ध दिशेने प्रवास केल्याबाबत ३३ चलन वाहतूक पोलिसांनी जारी केले.



# स्व संतोष देशमुखांच्या स्वप्नपूर्तीसाठी नाम फाऊंडेशन मस्साजोग मध्ये दाखल

## ३ कि.मी नदी नाले खोलीकरणांचे नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून होणार काम.

मस्साजोग/प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व .संतोष देशमुखांच्या राहिलेल्या विकास कामांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी दिनांक १६ रविवार रोजी नाम फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली ड अजित देशमुख यांनी मस्साजोगकरांची भेट घेतली. सरपंच स्व. देशमुख यांनी गावच्या विकासासाठी केलेला निर्धार आणि पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी नाम फाऊंडेशनने पुढाकार हाती घेतला आहे. नामच्या माध्यमातून ३ कि.मी नदी ,नाले खोली करण , पाणी आडवण्यासाठी मोठे काम करण्यासाठी ॲड देशमख यांनी मस्साजोग येथे जाऊन पाहणी केली व देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली आणि मस्साजोगकरांशी चर्चा केली .प्रसार माध्यमांशी संवाद साधतांना ड देशमुख म्हणाले

येत्या काही दिवसात हे काम चालू होईल. स्व. संतोष देशमुख यांना ही श्रध्दांजली ठरेल. या कामात मी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी गावातील भागवत कदम, जालिंदर देशमुख,पंजाबराव देशमुख, गणपत मोरे, शिरीष देशमुख, महादेव उंद्रे, तुषार देशमुख, सोपानराव देशमुख, सुदर्शन देशमुख, संदीपान थोरात, डॉ. भगीरथ बांड ,उत्तमराव देशमुख,जालिंदर देशमुख इत्यादीसह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रेम प्रकरणातून जालन्याचा ट्रक ड्रायव्हर विकास बनसोडेची आष्टीत निर्घुण हत्या

## मालकाच्या मुली सोबत प्रेम केल्याने दोन दिवस झाडाला बांधून बेदम मारहाण करत जीवे मारल्याची धक्कादायक माहिती उघड

बीड /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरीत प्रेम प्रकरणातून जालना येथील रहिवासी असलेला आणि भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर ड्रायव्हर म्हणून काम करत असलेल्या विकास बनसोडे या युवकाला मालकाच्या मुलीवर प्रेम केले म्हणून तब्बल दोन दिवस झाडाला बांधून बेदम मारहाण करत अतिशय क्रूरतेने हत्या करण्यात आली. मसाजोग येथील हत्या कांडानंतर बीड जिल्हा सर्वत्र गाजत असताना आता आष्टी तालुक्यातील या हत्याकांडाने बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे.

मयत विकास बनसोडे हा जालना जिल्ह्यातील तरुण आष्टीत ट्रक ड्रायव्हरचं काम करत होता. भाऊसाहेब क्षीरसागर सहित सात जणांच्या अमानुष मारहाणीत त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याला आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे दोन दिवस झाडाला डांबून बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तो आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील भाऊसाहेब क्षीरसागरच्या ट्रक वर ड्रायव्हर म्हणून कामाला होता. मात्र त्याची भाऊसाहेब क्षीरसागर आणि इतर सात लोकांनी अमानुष मारहाण करून हत्या केल्याचे उघड झालं. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी हानकुडे यांनी दिली आहे. विकास बनसोडेचा भाऊ आकाश बनसोडेने पोलिसांत जबाब नोंदवला. या जबाबात आकाश बनसोडेने म्हटलं की, 'माझा भाऊ विकास बनसोडे २०१८ साली पिंपरी घुमरीमध्ये भाऊसाहेब क्षीरसागरकडे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करत होता. तो २० फेब्रुवारी २०२५ रोजी जालन्याला घरी आला. त्यानंतर १२ मार्चला पुन्हा होळीसाठी मालकाच्या बोलावण्यावरून आष्टीला गेला. आष्टीला जाताना सांगून गेला'.'१५ मार्च रोजी क्षीरसागरचा दुपारी फोन आला. त्याने आई-वडील आणि नातेवाईकांना घेऊन ये. त्यानंतर विकासला घेऊन जा असे सांगितले. विकासला घेऊन जायचे नसल्यास आमच्या पद्धतीने त्याचे काय करायचे ते करतो. काय झालं विचारल्यावर, आष्टीत आल्यावर सांगतो, असं क्षीरसागरने सांगितलं. त्यानंतर विकास सोबत काम करणार्या मित्रांना फोन विचारलं. त्यावेळी त्याने मी आणि विकास दोघे मालकाच्या घरी असल्याचे सांगितले.'विकास आणि भाऊसाहेबाच्या मुलीचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून दोघांना घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये ठेवल्याचे विकासच्या मित्राने सांगितले. स्वाती भाऊसाहेब क्षीरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर, संकेत भाऊसाहेब क्षीरसागर, संभाजी झांबरे, सचिन भवर, भाऊसाहेब क्षीरसागर यांचे मोठे दाजी, सुशांत शिंदे, बापुराव शिंदे यांनी दोघांना बांधून ठेवलं. त्यांना दोरी आणि वायरच्या सहाय्याने बेदम मारहाण केली. महिलांनी शिवीगाळ केली, असेही त्याने जबाबात पुढे सांगितले.

'आम्ही भाऊसाहेबाच्या घरी गेलो. त्यावेळी विकासच्या पोटात दुखत आहे. त्याला सरकारी दवाखान्यात दाखल केल्याचं सांगण्यात आल. त्यानंतर आम्ही रुग्णालयात गेलो. आम्ही भाऊसाहेबाला फोन केला. त्यावेळी त्याचा मोबाईल बंद होता. त्यानंतर भाऊसाहेबचा भाऊ बाबासाहेबाला कॉल केला. त्यावेळी विकासला शासकीय रुग्णालयात टाकल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलिसांत धाव घेतली. त्यानंतर बाबासाहेबाने फोन बंद केला, असे आकाशने पुढे सांगितले.'मी सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांना विचारले. त्यावेळी डॉक्टर म्हणाले, गाडीमध्ये २ जण येऊन विकासला दवाखान्यात दाखल करून नाव गाव न सांगता लगेच निघून गेले. डॉक्टरांनी विकासची तपासणी केली, त्यावेळी त्यांनी विकासला मृत घोषित केले., असे आकाशने सांगितले.



# श्रीक्षेत्र पावनधामच्या बीजोत्सवाला भाविकांची मांदियाळी,महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या कीर्तनाने सांगता, सप्ताहात झाले विविध कार्यक्रम

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील प्रति देहू म्हणून सुप्रसिद्ध असणारे श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथील बीजोत्सवाला भाविकांचा जनसागर लोटला.दि.१६ मार्च वार रविवार रोजी ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या काल्याचे किर्तनाने बीजोत्सवाच्या सोहळ्याची सांगता झाली श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे संस्थानचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शना खाली जगद्गुरु संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्याचे आयोजन केले होते.या निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनामसप्ताहाची सांगता ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.याप्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा,अंबा साखर कारखान्याचे चेअरमन रमेश आडसकर माजी सभापती तानाजी देशमुख,केज पंचायत समितीचे माजी उप सभापती ऋषीकेश आडसकर,हनुमंत काका मोरे,कॉंग्रेसचे राहुल सोनवणे,वसंतराव मोरे, माजी जिल्हापरिषद सदस्य शंकर उबाळे, ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव बालासाहेब काकडे,ड. गजानन चौगुले,गणेश महाराज भगत,उद्योजक प्रशांत निगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.सात दिवसांपासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात गाथा पारायण, श्रीमद् भागवत कथा व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांच्या हरि कीर्तनातून प्रबोधन, सप्ताहात अन्नदान,युवा शक्ती प्रबोधन शिबिरे या सारख्या उपक्रमातून अखंड हरिनाम सप्ताहात रंग चढला.पावनधाम येथे पंचक्रोशीतील जवळपास ४० गावांहून पायी दिंड्यां च्या माध्यमातून हजारो भाविक पावनधाम येथील सप्ताहासाठी आले होते. टाळ,मृदंगाचा गजर करत संत ज्ञानोबा,तुकोबा, विठोबाच्या नामाच्या गजरात दिंडीने आलेल्या वारकऱ्यांमुळे पावनधाम ला देहूचे स्वरूप आले होते.सात दिवस चालले ल्या बीजोत्सवासाठी आलेल्या सर्व भाविकां साठी दररोज पंचक्रोशी तील सर्व गावाहून प्रत्येक घरातून माधुकरीच्या स्वरूपात भाकरी येत होत्या,तर दानशूर अन्नदात्यांच्या माध्यमातून इतर अन्नदान व महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.सदेह वैकुंठ गमनाच्या दिवशी व काल्याच्या दिवशी पुणे येथील उद्योजक नामदेव राव गोरे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले होते.सात दिवस चाललेल्या कार्यक्रमा साठी श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथील स्वयंसेवकांनी ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले.

# बीडमध्ये खास महिलांसाठी धुलिवंदन महोत्सवाची मुहूर्तमेढ हिरकणी सौ हेमा विभुते यांनी रोवली - डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

सलग तिसऱ्या वर्षी हिरकणी हुरडा पार्टीच्या संचालिका सौ.हेमा विभुते यांनी दिनांक १४ मार्च २०२५ रोजी हिरकणी धुलिवंदन महोत्सव साजरा केला. या प्रसंगी महिलांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राची हास्य जत्रा मधील विनोदाचे बादशाह गौरव मोरे यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावले होते. उद्घघाटक म्हणून बीडच्या माजी नगराध्यक्ष डॉ.सौ.दीपाताई क्षीरसागर यांची उपस्थिती होती.

त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बीड मध्ये महिलांसाठी खास होळीचा कार्यक्रम घेण्याची सुरुवातच सौ.हेमा विभुते यांनी केली.पैठणीच्या व्यवसायातून त्यांनी घराघरातील प्रत्येक महिलांपर्यंत पैठणी नेली आहे.हुरडा




पार्टी सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत, असे ही त्यांनी सांगितले आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

गौरव मोरे यांनी महिलांशी संवाद साधताना सांगितले की,पुरुष तर बारा ही महिने एन्जॉय करतात पण महिला ही आता स्वतःच्या आनंदासाठी वेळ देतात ही चांगली बाब आहे.बीड इथे येऊन आज खूप आनंद झाला, असे ही मत त्यांनी व्यक्त केले.या प्रसंगी सौ जयश्री विधाते आणि डॉ.सौ आशा वरपे यांनी देखील या हिरकणी होळी महोत्सवाला भरभरून शुभेच्छा दिल्या.गौरव मोरे यांनी महिलांसोबत खूप धम्माल केली.नृत्य,विनोद,प्रत्येक महिलेसोबत सेल्फी घेतली.कलाकार हा कितीही मोठा झाला तरी त्याचे पाय जमिनीवर असावेत.याचा प्रत्यय त्यांच्या कडे पाहिल्यावर आला.त्यांच्या सोबत दिग्दर्शक शशिकांत गंगावणे हे देखील आले होते.या कार्यक्रमाची सुरुवात फुलांची आणि रंगाची बरसात करून झाली.दिवसभर महिलांनी मनसोक्त एन्जॉय केला आणि सोबतीला वेलकम ड्रिंक,भरपेट जेवण ही होते..दिवसभर हिरकणी होळी महोत्सवात सहभागी होऊन समाधानी झाल्याचे मत महिलांनी व्यक्त केले.

# पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १७ मार्च, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांची जयंती. २१ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्लुईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सील्पेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला.

# १९ मार्चला महाराष्ट्रात सर्वदूर अन्नत्याग

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

१९ मार्च रोजी महाराष्ट्रातील लाखो शेतकरी व किसानपुत्र अन्नत्याग करून आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना सहवेदना प्रकट करणार आहेत. ठिकठिकाणी सामूहिक उपोषणाचे कार्यक्रम व सहवेदना सभा होणार आहेत. केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या घटून १० ते १५ टक्के राहिली आहे. तरीही तेवढ्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, जेवढ्या ५० ते ६० टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून होते. याचा अर्थ असा की, केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबावरील संकट अधिक वाढले आहे. महाराष्ट्रात दररोज ७ ते ८ आत्महत्या होत आहेत. म्हणून या वर्षी किसान पुत्रांनी १९ मार्चला अन्न त्याग करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी केले आहे.

१९ मार्च हा शेतकारी सहवेदना दिवस आहे, या दिवशी लोकसभा-विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत, यासाठी उपाययोजना करावी, असे आवाहन अमर हबीब यांनी केले. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना तसे पत्रही पाठविले आहे.



**1 प्रतिकुटुंब १८ हजार द्या**

ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत, असे दिसून येते. राहिलेल्या १०-१५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल याचा तातडीने विचार केला पाहिजे. सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी १८ हजार रुपये महिना ठरवले आहे. तसे १८ हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचवण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी इतर अनुदान बंद करावी लागली तर ती बंद करावी, अशी सूचना अमर हबीब यांनी केली आहे.

**2 विशेष अधिवेशन बोलवा**

संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक आत्महत्येला १९ मार्च रोजी ३९ वर्षे होतात. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधानसभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा साधा ठराव देखील करण्यात आला नाही. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती संवेदनाशून्य झाले आहेत.




# आधुनिक नेकनूर बसस्थानकाच्या लोकार्पणालाही मुहूर्त सापडेना

नेकनूर /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथे अत्याधुनिक बसस्थानक बांधण्यात आले असून त्याचे अद्याप लोकार्पण झालेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्रवाशांनाही फायदा होत नाही. त्याचबरोबर येथील बसस्थानकात ऑनलाईन बस तिकीट आरक्षणाची व्यवस्था नसल्याने येथील प्रवाशांना केज येथे जाऊन बसचे आरक्षण करावे लागत आहे. प्रत्येक दिवशी रात्री आठ नंतर वाहतूक नियंत्रण नसल्याने येणाऱ्या बस स्थानकात न येताच थेट केज-मांजरसुंबा महामार्गावरून पुढे जात आहेत.त्यामुळे प्रवाशांना बसची वाट पाहत ताटकळत बसावे लागते. प्रवाशांना थेट महामार्गावरच उतरावे लागत आहे. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

संगणकीकृत आरक्षणाची सुविधा नसल्याने गैरसोयबीड तालुक्यातील नेकनूर येथून दररोज ३०० पेक्षा अधिक बस ये-जा करतात. त्यामुळे तालुक्यात ये बसस्थानक ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी महत्त्वाचे आहे. मुंबई, पुणे, वसई, जालना, छत्रपती संभाजीनगर, लातूर, बीड, भुसावळ, नांदेड, हैदराबाद, उदगीर या ठिकाणी लांब पल्ल्याच्या बस धावतात, परंतु या ठिकाणी अद्याप संगणकीकृत आरक्षणाची सुविधा उपलब्ध नाही.आरक्षणासाठी प्रवाशांना केजचा हेलपाटा नेकनूरसह परिसरातील प्रवाशांना जर बसचे आरक्षण करायचे असेल तर त्यांना केज किंवा अन्य ठिकाणी जाऊन बस आरक्षण करावे लागत आहे.सध्या अंबाजोगाई-बोरिवली आणि धारूर-आळंदी या दोन बससाठी आरक्षणाची सोय उपलब्ध आहे, उर्वरित बसेससाठी ही सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**रात्री स्थानकात बस येत नाहीत, सुरक्षा नाही**

रात्रीच्या वेळी आम्ही बसस्थानकात उभे असतो, पण बस स्थानकात न येताच बाहेरूनच निघून जाते. त्यामुळे आम्हाला महामार्गावर जाऊन उभे रहावे लागते. एवढ्या मोठ्या व अत्याधुनिक बसस्थानकाचा उपयोग काय, जर प्रवाशांना सुविधाच मिळत नसतील तर स्वच्छतागृह कुलूपबंद असते . त्यामुळे महिलांसह सर्व प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, अशी प्रतिक्रिया संजय शिंदे यांनी दिली आहे.

# सतीश भोसले जातीय राजकारणाचा बळी

## तो पारधी समाजाचा असल्यानेच कारवाई ; वकील अंकुश कांबळे यांचा मोठा दावा



बीड / प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या सतीश भोसले उर्फ खोक्या भाईवर अनेक आरोप होत आहेत. इतकेच नाही तर त्याचे अनेक व्हिडिओ देखील व्हायरल झाले आहेत. त्याला प्रयागराज येथून अटक केल्यानंतर त्याला बीड न्यायालयात हजर करण्यात आले. मात्र यावेळी सतीश भोसलेचे वकील अंकुश कांबळे यांनी मोठे दावे केले आहेत. सतीश भोसले हा राजकारणाचा बळी ठरला असल्याचा आरोप अंकुश कांबळे यांनी केला आहे. एखाद्या मागासवर्गीय व्यक्तीने आमदाराचा कार्यकर्ता होऊ नये का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यामध्ये सध्या जातीचे राजकारण सुरू असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे.

सतीश भोसले हा सामाजिक कार्यकर्ता असल्याचा दावा त्यांनी केला आहे. गरीब मुलांना वह्या व पुस्तकांचे वाटप,उस तोड कामगारांना रेशन तसेच धान्य पुरवणे, गरिबांना मदत करणे अशी कामे सतीश भोसले हा करत असतो. त्याचे चांगली काम समोर आणली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र त्याच्या भोवती खोटे आरोप केले जात असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. आमदार सुरेश धस यांच्यावर असलेला राग हा सतीश भोसले याच्यावर काढला जात असल्याचा आरोप कांबळे यांनी केला आहे.

सतीश भोसले याच्या प्रकरणात वड्याचे तेल वांग्यावर निघाले आहे. सतीश भोसले यांचे घर तोडले गेले, ते कुणालाही मान्य होणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर शुक्रवारी होळीच्या दिवशी अज्ञात व्यक्तीने सतीश भोसले यांचे घर पेटवून दिले होते. यामध्ये अनेक जीवनावश्यक वस्तू जाळण्यात आल्या असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. इतकेच नाही तर या ठिकाणी असलेल्या महिलांना देखील मारहाण केली असल्याचा आरोप कांबळे यांनी केला आहे.

सतीश भोसले याला घेऊन बीड पोलिस महाराष्ट्रात दाखल झाले आहेत. प्रयागराजहून त्याला छत्रपती संभाजीनगर येथे आणण्यात आले आणि तिथून त्याला बीडच्या शिरूर कासार येथे नेण्यात आले आहे. तिथे त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. यानंतर सतीश भोसले याला २० तारखेपर्यंत पोलिस काठडी सुनावली आहे. या दरम्यान आता त्याच्याव वकिलांनी अनेक मोठे दावे केले आहेत.



सय्यद फवाद साजेद सलीम वय. ८ वर्ष आणि सय्यद उसेद शाहेद सलीम वय १० वर्ष दोघे राहणार बालेपीर, बीड या दोन्ही चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. यानिमित्ताने दोघांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सय्यद फवाद आणि सय्यद उसेद यांनी वयाच्या आठव्या व दहाव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. यानिमित्ताने आई, वडील, आजी, आजोबा,आणि सर्व नातेवाईकांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या..

# भाजपवासी झालेले अबरार कुरेशी यांची शिवसेना (ठाकरे) मध्ये पंधरा दिवसातच पुन्हा घर वापसी



बिलालकआमदार कैलास पाटील यांचे खंदे समर्थक असलेले कुरेशी यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला होता. मात्र पंधरा दिवसांतच त्यांनी पुन्हा शिवसेना (ठाकरे) मध्ये दि.१५ मार्च रोजी जाहीर प्रवेश करून घर वापसी केली आहे.धाराशिव शहरातील अबरार कुरेशी यांनी दि.२८ फेब्रुवारी रोजी शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये वैराग नाका येथे मोठ्या जल्लोषात आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला होता. मात्र त्यांचे भाजपमध्ये मन न रमल्याने त्यांनी पुन्हा शिवसेना (ठाकरे) मध्ये खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, थरआमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये (ठाकरे) मध्ये प्रवेश केला. यावेळी शिवसेना नेते दीपक जाधव व शिवसेना शहर संघटक शहबाज पठाण आदी उपस्थित होते.

# लोकशाही पत्रकार संघाच्या फरहान रऊफ होडेकर,साईनाथ कल्याण हांडे यांच्या निवड जाहीर

प्रतिनिधी । बीड





लोकशाही पत्रकार संघाच्या फरहान रऊफ होडेकर रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष पदी यांची निवड रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष फैमीदा शेख यांनी केली ,साईनाथ कल्याण हांडे पैठण तालुका कोषध्यक्ष पदी यांची निवड प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी यांनी केली.यांची निवड भागवत (बीबी )वैद्य सं. अ. लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार , प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके,राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष - माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष - संदीप जाधव,राष्ट्रीय कार्याध्यक्ष-मंगला वाघ,प्रदेश कार्याध्यक्ष -अयुब पठाण ,आयेशाखान मुलानी, टीव्ही -युट्युब चॅनल विकास समितीचे प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, अनिस कुरेशी , वसीम आजाद, बालाजी अडियाल, प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी-निलोफर शेख, श्रद्धा कंडूडे, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे,मराठवाडा अध्यक्ष - प्रभाकर पांडे, मराठवाडा सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली निवड जाहिर केली आहे .त्यांना लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव मुंबई,राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ मुंबई,प्रदेश ,प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी निलोफर शेख, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे,प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे केज,वसीम आजाद सिल्लोड,प्रभाकर पांडे नांदेड, प्रदेश सचिव हमीद खान जालना, कार्याध्यक्ष आयुब खान पठाण औरंगाबाद,मुंबई प्रदेश अध्यक्ष दत्तात्रय हंडीबाग केज,आत्माराम वाव्हाळ,बिलाल शेख, व लोकशाही पत्रकार संघाच्या पदाधिकारी या सर्वांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. साईनाथ कल्याण हांडे यांची निवड पैठण तालुका कोषध्यक्ष पदी केली आहे. मु. पो. अंतरवाली खांडी, ता.पैठण जि. संभाजीनगर येथील रहिवाशी असून अनेक दैनिक मध्ये काम केले आहे. फरहान रऊफ होडेकर यांना रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड हे राहणार खडक मोहल्ला, मस्जिद जवळ, मिरकरवडा, रत्नागिरी येथील असून ते सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आहेत.

# शिराढोणमधील तलाठी, मंडळ अधिकारी आणि कृषी अधिकारी मुख्यालयात अनुपस्थित ; शेतकरी अडचणीत

प्रतिनिधी । शिराढोण

**तालुक्यातील शिराढोण गावातील तलाठी, मंडळ अधिकारी आणि कृषी अधिकारी मुख्यालयात कायमस्वरूपी अनुपस्थित असल्यामुळे शेतकऱ्यांना आणि स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात गावातील नागरिक ताजखाँ नसिबी पठाण यांनी तहसीलदारांना लेखी अर्ज देऊन अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीबाबत तक्रार केली आहे.**

शिराढोणमध्ये तलाठी कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय आणि कृषी कार्यालय असूनही संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात. त्यामुळे शेतकऱ्यांची ७/१२ उतारे, वी.एम. पगार, पिक विमा, सरकारी अनुदाने आणि अन्य शासकीय योजनांशी संबंधित कामे खोळंबली आहेत. नागरिक आणि शेतकऱ्यांना वारंवार हेलपाटे मारूनही अधिकारी भेटत नसल्याने त्यांचे नुकसान होत आहे.

शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत ताजखाँ पठाण यांनी सांगितले की, *अधिकारी मुख्यालयात नसल्याने आम्हाला सातत्याने वेळ आणि पैसा वाया घालवावा लागतो. गरजेच्या कागदपत्रांसाठी पुन्हा पुन्हा चकरा माराव्या लागतात, मात्र अधिकारी भेटतच नाहीत. यामुळे अनेक शेतकरी विविध योजनांपासून वंचित राहत आहेत.*

शासकीय अधिकाऱ्यांसोबत संपर्क करण्यासाठी कोणतीही ठोस व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांचा रोष वाढत चालला आहे. तहसीलदारांनी यावर तातडीने लक्ष घालून संबंधित अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहतील याची खात्री करावी, अशी मागणी अर्जदार ताजखाँ पठाण यांच्यासह शेतकरी आणि नागरिकांनी केली आहे. अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# यूपीएससीकडून शास्त्रज्ञ पदासाठी देशात प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन...



प्रतिनिधी । बीड

मराठवाड्यातून शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था नागपूर व सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डसोबत काम केले. अनुसंधान अकादमीमध्ये बायोजिओफीजीक्स विषयात त्यांनी पीएचडी देखील केली आहे. गेल्या वर्षी केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून शास्त्रज्ञ पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. यासाठी देशभरातील ३८१ पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात आली होती. त्यामधून डॉ. पांडुरंग यांची देशात प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यासाठी ही अतिशय अभिमानाची बाब असून त्यांच्या या यशातून आपल्या परिसरातील तरुण-तरुणींना प्रेरणा नक्कीच मिळेल..



**बीड ( प्रतिनिधी ) :- कर्तव्यदक्ष मंडळ निरीक्षक शितल चाटे यांना रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या, मातृभूमी सामाजिक प्रतिष्ठान उत्कृष्ट गुणवंत राज्यस्त्रीय उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल काल शनिवार दिनांक १५ मार्च २०२५ रोजी सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करताना डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, आप चे जिल्हा अध्यक्ष अशोक येडे, नितीन जायभाये, पत्रकार संजय कुलकर्णी, स. अ. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य चे भागवत वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील दादा महाकुंडे, बीड शहर अध्यक्ष अशोक मायकर, पत्रकार बालाजी जगतकर दिसत आहेत.**